# महात्मा फुले कृषि विद्यापीठ

राहुरी - ४१३ ७२२, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र)

## ऑक्टोबर २०२५


# ई वार्ता




**LEGEND**

| | | |
|---|---|---|
| ■ | Central Campus of MPKV | |
| ● | Agril. Research Station | 27 |
| ★ | Post Graduate Institute | 01 |
| ✿ | Agril. Technology Information Centre | 01 |
| ⚘ | Regional Extension Centre | 04 |
| ✹ | District Extension Centre | 05 |
| ❄ | Krishi Vigyan Kendra | 04 |
| ✖ | Agricultural Tech. School | 08 |
| ✪ | Agricultural Engg. College | 02 |
| ✡ | Agricultural College | 08 |
| 8 | Horticulture College | 02 |
| © | ABM College -1 | 01 |
| @ | Food Technology College - 1 | 01 |
| # | Agriculture Polytechnic College - 1 | 01 |


मफुकृवि विस्तार प्रकाशन क्र.२८०८/२०२५

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

# मफुकृवि ई वार्ता

ऑक्टोबर २०२५



## शेतकऱ्यांसाठी ४२ हजार कोटी खर्चाच्या कृषि योजनांचा लोकार्पन सोहळ्याचे प्रक्षेपण कृषि विद्यापीठात संपन्न





**दि. ११ ऑक्टोबर, २०२५.** नवी दिल्ली, पुसा येथील राष्ट्रीय कृषि विज्ञान परिसरात देशाचे प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत शेतकऱ्यांसाठी ४२ हजार कोटींहून अधिक कृषि योजनांचा लोकार्पन सोहळा पार पडला. यावेळी देशाचे कृषि मंत्री शिवाराजसिंग चौहान, राज्यकृषि मंत्री भागीरथ चौधरी व्यासपीठावर उपस्थित होते. महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरु डॉ. शरद गडाख यांच्या मार्गदर्शनाखाली आणि विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे यांच्या अध्यक्षतेखाली या कार्यक्रमाचे ऑनलाईन प्रक्षेपन विद्यापीठात करण्यात आले. याप्रसंगी कृषि तंत्रज्ञान शिक्षणाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रशांत बोडके, वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. विजू अमोलिक, मृदाशास्त्र व कृषि रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. भिमराव कांबळे, कृषि अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. राजेंद्र हिले, कृषि प्रक्रिया अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. कैलास कांबळे, आंतरविद्याशाखा जलसिंचन विभाग प्रमुख डॉ. विजयकुमार पाटील, जीवरसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. प्रकाश लोखंडे, प्रमुख शास्त्रज्ञ बियाणे डॉ. नितीन दानवले व कापूस सुधार प्रकल्पाचे प्रमुख डॉ. पवन कुलवाल उपस्थित होते.

याप्रसंगी विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे म्हणाले शेतकऱ्यांच्या प्रगती आणि समृध्दीसाठी देशाचे पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी ४० हजार कोटींहून अधिक खर्चाच्या योजनांची भेट शेतकऱ्यांना आज दिली आहे. यामुळे खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांचा सन्मान झाला आहे. प्रधानमंत्री धनधान्य योजनेमुळे पिकांचे सरासरी उत्पादन व शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होईल आणि कडधान्य अभियानामुळे देश कडधान्यात स्वयंपूर्ण होइल. यावेळी डॉ. प्रशांत बोडके, डॉ. सुरेश दोडके, डॉ. विजू अमोलिक आणि डॉ. उल्हास सुर्वे यांनी एकात्मिक शेती पध्दती, कडधान्य व्यवस्थापन, रब्बी पीक व्यवस्थापन, सेंद्रिय शेतीतील एकात्मिक पीक व्यवस्थापन या विषयांवर उपस्थित शेतकरी व विद्यार्थी यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते प्रातिनिधीक स्वरुपात प्रगतशील महिला शेतकरी सौ. निर्मला गाढे, प्रगतशील शेतकरी व माजी सैनिक श्री. संदिप म्हसे, मेजर ताराचंद गागरे यांचा कृषिदर्शनी देवून सत्कार करण्यात आला. याप्रसंगी नवी दिल्लीवरुन प्रक्षेपीत होणाऱ्या अन्नदाताओंका सन्मान, समृध्द राष्ट्र का निर्माण हा कार्यक्रम झाल्यानंतर शेतकऱ्यांनी शास्त्रज्ञांबरोबर सुसंवाद साधला. यावेळी शास्त्रज्ञ, शेतकरी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार डॉ. भगवान देशमुख यांनी मानले.

## कापूस सुधार प्रकल्पामध्ये जागतिक कापूस दिन व शिवार फेरीचे आयोजन

**दि. ८ ऑक्टोबर, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठात अखिल भारतीय समन्वीत कापूस सुधार प्रकल्पामध्ये जागतिक कापूस दिन व शिवार फेरीचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के होते. यावेळी व्यासपीठावर विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे, नियंत्रक श्री. सदाशीव पाटील, वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. विजू अमोलिक, सहयोगी संशोधन संचालक डॉ. विजय शेलार, वरिष्ठ कापूस पैदासकार डॉ. पवन कुलवाल व किटकशास्त्रज्ञ डॉ. नंदकुमार भुते उपस्थित होते.

याप्रसंगी डॉ. विठ्ठल शिर्के मार्गदर्शन करतांना म्हणाले की कापूस सुधार प्रकल्पामध्ये कापूस पिकावर महत्वाचे संशोधन सुरु आहे. महाराष्ट्रात कापूस पिकाचे क्षेत्र मोठ्या प्रमाणात असून शेतकऱ्यांच्या दृष्टीने कापूस पीक महत्वाचे आहे. कापूस पीक तयार होण्यासाठी मोठा

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
मफुकृवि ई वार्ता
ऑक्टोबर २०२५

वर्ष :५, अंक क्रं. : ५८, ऑक्टोबर २०२५ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी









कालावधी लागतो. या पिकामध्ये कमी कालावधीत व जास्त उत्पादन देणाऱ्या कापूस वाणांची निर्मिती व्हावी. शेतकऱ्यांनी विद्यापीठातील शास्त्रज्ञांचे मार्गदर्शन घेवून विविध पिकांवरील किडी व रोगांचे व्यवस्थापन करावे त्यामुळे शेतकऱ्यांचा औषधांवरील खर्च कमी होईल. डॉ. गोरक्ष ससाणे यावेळी म्हणाले की मुंबईसह देशाच्या अर्थकारणात कापूस पिकाचे महत्व अनन्यसाधारण आहे. शेतकरी हा केंद्रबिंदू मानून विद्यापीठातील कापूस प्रकल्प काम करीत आहे. कापूस पिकाबद्दल जागृकता निर्माण होईल असे दिवस साजरे करणे तंत्रज्ञान प्रसारासाठी महत्वाचे कार्य होय. डॉ. साताप्पा खरबडे आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की कापूस सुधार प्रकल्पातील शास्त्रज्ञांनी कापूस पिकाच्या विविध वाणांची निर्मिती करून मोठे योगदान दिले आहे. या प्रकल्पाने शेतकऱ्यांना एकात्मिक पीक संरक्षण व्यवस्थापन हे तंत्रज्ञान दिले. विद्यापीठाने तयार केलेली जैविक कीडनाशके, सुपरबायोमिक्ससारखे उत्पादने वापरून शेतकऱ्यांनी कीटकनाशकांवर होणारा खर्च कमी करावा असे आवाहन त्यांनी यावेळी केले. यावेळी श्री. सदाशिव पाटील आपल्या मनोगतात म्हणाले की देशाच्या औद्योगिक क्रांतीमध्ये कॉटन मिल्सचा वाटा मोठा आहे. वस्त्र ही मानवाची मूलभूत गरज असण्याबरोबरच मानवाच्या आर्थिक स्थैर्यासाठी कपाशीचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. पूर्वी अखंड भारतात कपाशीची लागवड मोठ्या प्रमाणात होऊन कापसाची निर्यात सुद्धा मोठ्या प्रमाणावर होत होती. यावेळी डॉ. विजू अमोलिक व शेतकरी श्री. प्रकाश धोंडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. पवन कुलवाल यांनी केले. या कार्यक्रमाच्या सुरुवातीला कापूस, ज्युट व भुईमूग या पिकांच्या प्रात्यक्षिक प्लॉटला मान्यवर व शेतकऱ्यांनी भेटी दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. नंदकुमार भुते यांनी तर आभार डॉ. नानासाहेब मरकड यांनी मानले. कार्यक्रमासाठी विद्यापीठातील सहयोगी अधिष्ठाता, विविध विभागांचे विभाग प्रमुख, कापूस सुधार प्रकल्पातील सर्व शास्त्रज्ञ, कर्मचारी, विद्यापीठातील प्राध्यापक, विद्यार्थी व परिसरातील शेतकरी उपस्थित होते.

## कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे शेतकरी–शास्त्रज्ञ मंचाची स्थापना बैठक संपन्न

**दि. ३१ ऑक्टोबर, २०२५.** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे मा. कुलगुरू डॉ. शरद गडाख यांचे निर्देशानुसार सहयोगी अधिष्ठाता डॉ. दत्तात्रय सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली व सहयोगी प्राध्यापक कृषि विस्तार शिक्षण डॉ. गोकुळ वामन यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी–शास्त्रज्ञ मंचाची स्थापना बैठक संपन्न झाली. यावेळी सहयोगी प्राध्यापिका डॉ. प्रेरणा भोसले, सहाय्यक





प्राध्यापक श्री. पोपट पवार, डॉ. विवेकानंद कुलकर्णी यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, शेतकरी उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करतांना डॉ. दत्तात्रय सोनवणे म्हणाले की शेतकरी–शास्त्रज्ञ मंच हे व्यासपीठ कृषि विद्यापीठाने विकसित केलेल्या नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा वापर तसेच विद्यापीठातील शास्त्रज्ञ आणि शेतकरी यांच्यामध्ये समन्वय साधून मार्गदर्शन करण्याकरिता, एकंदरीत शेतकऱ्यांच्या व गावांच्या सर्वांगीण आर्थिक व सामाजिक विकासासाठी कार्य करते. विद्यापीठाअंतर्गत एकूण ५४ शेतकरी–शास्त्रज्ञ मंच असून त्यांचे एकूण ६०० सभासद आहेत. प्रत्येक वर्षी या शेतकरी–शास्त्रज्ञ मंचाची वर्षातून एक वेळेस कार्यशाळा घेतली जाते. सुसंवाद साधून शेतकऱ्यांच्या सर्व प्रकारच्या अडचणींवर चर्चा केली जाते. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातून सहयोगी प्राध्यापक डॉ. गोकुळ वामन यांनी शेतकरी–शास्त्रज्ञ मंचाची संकल्पना, वैशिष्ट्ये व कार्य पद्धती स्पष्ट केली. या बैठकीत शेतकऱ्यांना रब्बी हंगामातील पिकांच्या लागवड तंत्रज्ञानावर कृषिविद्या तज्ञ डॉ. अंबादास मेहेत्रे यांनी सखोल मार्गदर्शन केले.

शेतकरी–शास्त्रज्ञ मंचाच्या सर्व सभासदांचे स्वागत मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमादरम्यान रब्बी हंगाम २०२४–२५ मध्ये गव्हाच्या फुले समाधान वाणाचे एकरी १९ क्विंटल विक्रमी उत्पन्न घेतलेले जवळा येथील सभासद शेतकरी श्री. लक्ष्मण सूळ यांचा सहयोगी अधिष्ठाता यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. शेतकरी श्री. दिगंबर निंबाळकर, डॉ. दीपक वाळुंजकर व श्री. शरद ढवळे यांनी आपले मनोगत यावेळी व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन सहाय्यक प्राध्यापिका डॉ. प्रणाली ठाकरे यांनी केले.

## कसबे डिग्रज येथे हळद परिसंवाद संपन्न





**दि. १४ ऑक्टोबर, २०२५.** हळद संशोधन केंद्र, कसबे डिग्रज आणि भारत सरकारच्या वाणिज्य आणि निर्यात मंत्रालयाच्या अधिनस्त मसाले मंडळ, विभागीय कार्यालय, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने हळद गुणवत्ता सुधार प्रशिक्षण परिसंवाद कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शेंडापार्क, कोल्हापूर येथील विभागीय कार्यालयाचे सहयोगी संशोधन संचालक डॉ. सुनील कराड उपस्थित होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात मार्गदर्शन करतांना ते म्हणाले की भारत देश हळद उत्पादनात जगात अग्रेसर आहे. भारतीय हळदीला सगळ्यात जास्त मागणी आहे. त्यासाठी आपल्याला रेसिड्यु फ्री (अंश मुक्त) हळद उत्पादन करणे गरजेचे आहे. संशोधन केंद्राचे प्रभारी अधिकारी डॉ. श्रीमंत

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
मफुकृवि ई वार्ता
ऑक्टोबर २०२५

राठोड यांनी हळद पिकाचे विविध वाण, हळद शिफारशी याची माहिती शेतकऱ्यांना दिली. हळदीचे दर्जेदार पॅकिंग करून हळद विक्री करावी असे त्यांनी अधोरेखित केले. डॉ. ममता धनकुटे, सहाय्यक संचालक विपणन आणि निर्यात, मसाले मंडळ, विभागीय कार्यालय, मुंबई यांनी मसाले मंडळ करीत असलेल्या विविध योजनांची माहिती शेतकऱ्यांना दिली. सांगली जिल्ह्यातील शेतकरी बांधवांनी एकत्रित येऊन हळद उत्पादक कंपन्या स्थापन कराव्यात असं त्यांनी यावेळी आवाहन केले. सांगली जिल्हा परिषदेचे कृषि अधिकारी श्री. मनोजकुमार वेताळ यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारे हळद पिकामध्ये रोग, किड नियंत्रण, अंश मुक्त उत्पादन यासाठी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केल. प्रशिक्षणामध्ये हळद संशोधन केंद्राचे प्रभारी अधिकारी डॉ. मनोज माळी यांनी हळद पिकाच्या आदर्श पीक लागवड पद्धती, रुंद वरंबा पद्धत, मल्चिंग तंत्रज्ञान, रोग किडींचे सेंद्रिय दृष्ट्या व्यवस्थापन, सेंद्रिय निविष्ठांचा वापर करून अंशमुक्त उत्पादन कसे घेता येईल यावर चित्रफितीद्वारे माहिती दिली. या प्रशिक्षणामध्ये शेतकरी बांधवांच्या यशोगाथांमध्ये श्री. विनोद तोडकर, श्री. सचिन शेडशाळ आणि श्री. प्रताप सिंह मोहिते पाटील यांनी आपले हळद पीक उत्पादनातील अनुभव सांगितले. श्री. विठ्ठल चव्हाण यांनी जैविक बुरशीनाशकाचा वापर कसा करावा हे सांगितले. श्री. प्रज्वल गागरे यांनी आभार व्यक्त केले. या परिसंवादाच्या आयोजनासाठी श्री. प्रशांत पवार, श्री. प्रकाश जाधव, श्री. धुळदेव खरात, श्री. रविंद्र भगत यांनी परिश्रम घेतले. सांगली जिल्ह्यातील ८० हळद उत्पादक शेतकरी उपस्थित होते.

## मका सुधार प्रकल्पांतर्गत शिवनी येथे निविष्ठा वाटप कार्यक्रम संपन्न





**दि. ३० ऑक्टोबर, २०२५.** भारतीय मका संशोधन संस्था, लुधियाना यांच्याकडून मका सुधार प्रकल्प, कसबा बावडा, कोल्हापूर येथे शंभर टक्के अनुदानित तदर्थ योजना (इथेनॉल उद्योगांच्या कॅचमेंट क्षेत्रात मका उत्पादन वाढविणे) हा कार्यक्रम दोन वर्षांपासून चालू आहे. कोल्हापूर येथील मका सुधार प्रकल्प व भारतीय मका संशोधन संस्था, लुधियाना यांच्या वतीने शिवनी (ता. उत्तर सोलापूर) येथे मका उत्पादन वाढविण्यासाठी बियाणे, तणनाशके व सूक्ष्म अन्नद्रव्य निविष्ठा वाटप कार्यक्रम संपन्न झाला. महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू माननीय डॉ. शरद गडाख यांच्या मार्गदर्शनाखाली व संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के यांच्या नेतृत्वाखाली हा प्रकल्प केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालय भारत सरकार यांच्या निधीतून राबविण्यात येत आहे.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी कोल्हापूर येथील सहयोगी संशोधन संचालक तथा प्रमुख अन्वेषक मका पैदासकार डॉ. सुनिल कराड यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करून निविष्ठा वाटप केले. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांना शास्त्रीय पद्धतीने मका लागवड करण्याचे आवाहन करून अधिक उत्पादनासाठी एकरी २६००० ते २८ हजार रोपसंख्या राखण्याचे महत्त्व सांगितले. त्यासाठी एकरी आठ किलो बियाणे व पेरणी अंतर ७५ × २२ सेंटीमीटर ठेवण्याचे आवाहन केले. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांना महात्मा फुले कृषी विद्यापीठाने विकसित केलेले फुले मायक्रोन्यूट्रिएंट ग्रेड टू वापरण्याचा सल्ला दिला. या प्रकल्पाचा उद्देश शेतकऱ्यांना उच्च प्रतीचे हायब्रीड मका बियाणे, सूक्ष्म अन्नद्रव्य, तणनाशके व प्रशिक्षण उपलब्ध करून देऊन मका उत्पादन व उत्पादकता वाढविणे हा आहे. या कार्यक्रमांतर्गत मका संकरित वाण ३२० किलो बियाणे, सूक्ष्म अन्नद्रव्य प्रत्येकी एक लिटर फुले मायक्रोन्यूट्रियंट ग्रेड टू व तणनाशक अशा निविष्ठा शिवनी व आसपासचे पाच गावातील एकूण ८० पुरुष व सहा महिला शेतकरी यांना वाटप करण्यात आले.

यावेळी डॉ. पशुपत वासमतकर, श्री. संदीप गुंड, श्री. रुक्मगत गुंड आणि शिवणी गावातील शेतकरी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे नियोजन करण्यासाठी डॉ. प्रवीण गजभिये, डॉ. सुहास भिंगारदिवे व श्री. सागर शेळके यांनी परिश्रम घेतले.

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
मफुकृवि ई वार्ता
ऑक्टोबर २०२५

वर्ष :५, अंक क्रं. : ५८, ऑक्टोबर २०२५ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि महाविद्यालयामध्ये दीक्षारंभ–२०२५ आणि अभिजात मराठी भाषा सप्ताह या कार्यक्रमाचे आयोजन



**दि. १० ऑक्टोबर, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठात डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि महाविद्यालयामध्ये दीक्षारंभ–२०२५ आणि अभिजात मराठी भाषा सप्ताह या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सचिन नलावडे होते. याप्रसंगी या कार्यक्रमासाठी प्रमुख व्याख्याते म्हणुन अहिल्यानगर येथील पेमराज सारडा महाविद्यालयाच्या मराठी विषयाच्या प्रमुख श्रीमती दया भोर व सोलिस यानमार ट्रॅक्टर्सचे विभागीय व्यवस्थापक व महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी इंजि. महेश इथापे उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर मालेगाव, काष्टी येथील छत्रपती शिवाजी महाराज कृषि विज्ञान संकुलाचे प्रमुख डॉ. सचिन नांदगुडे, कृषि प्रक्रिया अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. कैलास कांबळे, अक्षय उर्जा अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. विरेंद्र बारई, जलसिंचन व निचरा अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. शैलेंद्र गडगे व कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहाय्यक कुलसचिव श्री. वैभव बारटक्के उपस्थित होते.

डॉ. सचिन नलावडे मार्गदर्शन करतांना म्हणाले की शेतीमध्ये यांत्रिकीकरण गरजेचे झाले आहे. शेतीक्षेत्रात ट्रॅक्टर्सचे महत्व वाढले आहे. त्याचबरोबर ट्रॅक्टर्सचलीत अवजारांच्या तंत्रज्ञानात मोठी क्रांती घडत आहे. शेतीमधील महत्वाच्या कामांकरीता लागणाऱ्या अवजारांमध्ये कृत्रिम बुध्दीमत्तेवर आधारीत तंत्रज्ञानाचा वापर होत असून यासाठी आपलेही सर्वोत्कृष्ठ योगदान द्या. मराठी भाषा खुप समृध्द आहे. ती शिका व स्वतःही समृध्द व्हा. मराठी भाषेबद्दल तुम्हाला अभिमान असला पाहिजे. श्रीमती दया भोर मराठी भाषा या विषयावर आपल्या भाषणात म्हणाल्या की तुमच्या भाषेतून तुमची संस्कृती, समाजातील तुमचे स्थान, तुमची आर्थिक स्थिती, तुमची मनस्थिती व सध्याची अवस्था समजते. मराठी भाषेतून व्यक्त होण्यासाठी तीचे परिपूर्ण ज्ञान आवश्यक आहे. त्यासाठी वाचन महत्वाचे आहे, तो एक छंद आहे. त्यामुळे भाषेचे सौंदर्य वाढेल. तुम्ही बोलू शकाल, लिहू शकाल. आपल्याकडून ज्ञानाची निर्मिती झाली तरच आपण आपल्या मराठी भाषेला प्रतिष्ठा मिळवून देवू शकतो. इंजि. महेश इथापे कृषि अभियंत्यांसाठी विपणनातील संधी या विषयावर मार्गदर्शन करतांना म्हणाले की भारतात सद्यस्थितीत ४७ टक्के शेतीतील यांत्रिकीकरण झाले आहे. दिवसेंदिवस यांत्रिकीकरणाचा वेग वाढत आहे. नवनवीन तंत्रज्ञान येत आहे. शेतीच्या यांत्रिकीकरणामध्ये कृत्रिम बुध्दीमत्ता, ड्रोन, सेंसर्सरचा वापर वाढत आहे. याचे शिक्षण घ्या. विद्यार्थ्यांना उद्देशुन ते म्हणाले की यश सहज मिळत नाही, त्यासाठी भरपूर मेहनत करा, शिकत रहा. आयुष्यामध्ये सतत शिकण्याची तयारी ठेवा. तुम्ही जे शिक्षण घेत आहात ते तुम्हाला पुढील ध्येय गाठण्यासाठी सक्षम करील.

यावेळी अभिजात मराठी भाषा सप्ताहाच्या निमित्ताने मराठी असे आमुची मायबोली या विषयावरील निबंध स्पर्धेतील विजेत्यांचे मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तीपत्रक देवून सत्कार करण्यात आला. यामध्ये प्रथम क्रमांक चि. निरज पठारे, द्वितीय क्रमांक कु. रेणूका झनान, तृतीय क्रमांक कु. अस्मीता मोरे, कु. साक्षी घाडगे व कु. सानिका लाकडे तसेच प्रोत्साहनपर पारितोषिक विजेता चि. शुभम गायकवाड यांचा समावेश होता. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. कैलास कांबळे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमेय घाणेकर याने तर आभार डॉ. महेश पाचारणे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वर्ष :५, अंक क्रं. : ५८, ऑक्टोबर २०२५ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि महाविद्यालयामध्ये दीक्षारंभ-२०२५ आणि जागतिक अन्न दिवस या कार्यक्रमाचे आयोजन







**दि. १६ ऑक्टोबर, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठात डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि महाविद्यालयामध्ये दीक्षारंभ-२०२५ आणि जागतिक अन्न दिवस या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे होते. या कार्यक्रमाचे आयोजक म्हणुन डॉ. सचिन नलावडे उपस्थित होते. याप्रसंगी या कार्यक्रमासाठी प्रमुख व्याख्याते म्हणुन तरुणांसाठीचे मार्गदर्शक तसेच इस्कॉनचे प्रचारक इंजि. सुरज थोरात उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर पदव्युत्तर महाविद्यालयाच्या अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभागाचे प्रमुख डॉ. विक्रम कड, जलसिंचन व निचरा अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. शैलेंद्र गडगे व कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहाय्यक कुलसचिव श्री. वैभव बारटक्के उपस्थित होते.

यावेळी डॉ. सचिन नलावडे मार्गदर्शन करताना म्हणाले की जगामध्ये अर्धपोटी राहणाऱ्यांची संख्या खूप मोठी आहे. या उलट उपहारगृहांमध्ये वाया जाणाऱ्या अन्नाचे प्रमाण चिंताजनक आहे. या पार्श्वभूमीवर आज आपण शपथ घेऊया की मी माझ्या ताटातील अन्नाचा एकही कण वाया घालवणार नाही. ताटात घेतलेले अन्न वाया जाऊ देणार नाही. या पृथ्वीवर राहणाऱ्या सर्वांसाठी अन्नसुरक्षा महत्त्वाची आहे. इंजि. सुरज थोरात यांनी यावेळी विद्यार्थ्यांना चांगल्या सवयी अंगी बाळगण्यासाठी करावे लागणाऱ्या उपायांची माहिती दिली. यावेळी मार्गदर्शन करताना ते म्हणाले की तुमच्यासोबत असलेले तुमचे मित्र, तुम्ही ऐकत असलेले संगीत, तुम्ही वाचत असलेली पुस्तके व तुम्ही कोणत्या प्रकारचे चित्रपट पाहता यावरून तुमचे चरित्र कळते. यासाठी चांगले पहा, चांगले वाचा, चांगला विचार करा. वाईट सवयीपासून दूर राहा. यासाठी मूल्यशिक्षण महत्त्वाचे आहे.

या कार्यक्रमाविषयी माहिती देताना डॉ. विक्रम कड म्हणाले की आजच्या जागतिक अन्न दिवसाची थीम उज्वल भविष्यासाठी व चांगले अन्न मिळविण्यासाठी हातात हात घालून प्रयत्न करूया अशी आहे. भूकबळीचे संपूर्ण उच्चाटन करण्यासाठी जागृती करणे हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. यावेळी नाविन्यपूर्ण प्रकल्प स्पर्धा व पोस्टर सादरीकरण स्पर्धेतील विजेत्यांचा मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तीपत्रक देवून सत्कार करण्यात आला. यामध्ये नाविन्यपूर्ण प्रकल्प स्पर्धेत प्रथम क्रमांक कु. तनुजा गुजवणे व द्वितीय क्रमांक विजेती कु. वैष्णवी भरते, पोस्टर सादरीकरण स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त विद्यार्थी चि. शुभम गायकवाड, चि. ऋषिकेश निकम, चि. तन्मय चव्हाण, चि. सार्थक राजपूत, चि. सुजल कर्डिले यांचा तर द्वितीय पुरस्कारप्राप्त विद्यार्थी चि. अगुश बस्ते व कु. वैष्णवी सुतार यांचा समावेश होता. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. विक्रम कड यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुनील फुलसावंगे यांनी तर आभार डॉ. महेश पाचारणे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि महाविद्यालयामध्ये दीक्षारंभ-२०२५ च्या निमित्ताने स्पर्धेशिवाय यश या विषयावर व्याख्यान आयोजन

**दि. ३१ ऑक्टोबर, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठात डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि महाविद्यालयामध्ये दीक्षारंभ-२०२५ च्या निमित्ताने स्पर्धेशिवाय यश या विषयावर व्याख्यान आयोजीत करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. सचिन नलावडे होते. याप्रसंगी या कार्यक्रमासाठी प्रमुख व्याख्याते म्हणुन पुणे येथील विश्वकुलम संस्थेचे संस्थापक इंजि. विश्वनाथ पाटील उपस्थित होते. यावेळी



व्यासपीठावर कृषि प्रक्रिया अभियांत्रिकी विभागाचे प्रमुख डॉ. कैलास कांबळे, जलसिंचन व निचरा अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. शैलेंद्र गडगे, अक्षय उर्जा अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. विरेंद्र बारई व कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहाय्यक कुलसचिव श्री. वैभव बारटक्के उपस्थित होते.

अध्यक्षीय मार्गदर्शन करताना डॉ. सचिन नलावडे म्हणाले की मानवी जीवन खुप सुंदर आहे. ते आनंदाने जगण्यासाठी प्रत्येक क्षणाचा आनंद घ्या. जे काही चांगले आहे ते स्वीकारा. मी पणा सोडा. चांगले कर्म करत रहा, त्याचे फळ चांगले मिळेल. जीवनात यशाच्या प्राप्तीसाठी वास्तवात राहून आनंदाने जीवन जगा. यावेळी इंजि. विश्वनाथ पाटील स्पर्धेशिवाय यश या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन करतांना म्हणाले की जीवनात प्रत्येक बाबतीत यश मिळविणे, यशस्वी होणे हे प्रत्येकाचे ध्येय असते. आपल्या आयुष्यात प्रत्येक टप्प्यावर स्पर्धा असते. या स्पर्धेतूनच तणाव निर्माण होतो व या तणावामुळे आपण आपल्या जगण्यातील खरा आनंद हरवून बसतो. त्यासाठी यशस्वी होणे म्हणजे काय हे समजून घ्या. आयुष्यात प्रत्येक गोष्ट प्रेमाने करा, आनंदाने करा, त्याचा आनंद घेवून पुढे जा. भविष्यातील यश मिळविण्यासाठी केलेली ती तयारी ठरेल. आपले आयुष्य आपल्या ताब्यात असले पाहिजे. दुसऱ्याशी तुलना न करता, कोण काय म्हणेल याचा विचार न करता आयुष्य जगता आले पाहिजे. आयुष्यात घडलेल्या नकारात्मक गोष्टी विसरुन वास्तवामध्ये प्रत्येक क्षण आनंदात जगणे महत्वाचे आहे. सध्याची परिस्थिती जशी आहे तशीच स्वीकारणे व पुढे दमदारपणे आयुष्याची वाटचाल करणे महत्वाचे असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. कैलास कांबळे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चि. अमेय घाणेकर याने तर आभार डॉ. महेश पाचारणे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत ''स्वच्छता ही सेवा'' अभियान संपन्न

**दि. २ ऑक्टोबर, २०२५.** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे स्वच्छता ही सेवा अभियान– २०२५ हे युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय, भारत सरकार यांचे निर्देशानुसार १७ सप्टेंबर, २०२५ ते ०२ ऑक्टोबर, २०२५ या कालावधीत राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांच्या सहाय्याने विविध उपक्रमांचे आयोजन करून यशस्वीरित्या साजरे करण्यात आले. यामध्ये, १७ सप्टेंबर रोजी रक्तदान अमृत महोत्सव अंतर्गत पथनाट्याद्वारे रक्तदानाविषयी जनजागृती करण्यात आली, १८ सप्टेंबर रोजी स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छता उत्सव महाविद्यालयाच्या आजूबाजूच्या परिसरामध्ये राबविला, २२ सप्टेंबर रोजी भारतरत्न डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या शिक्षण क्षेत्रातील योगदानास स्मरण करून महाविद्यालयातील विद्यार्थी प्रिय प्राध्यापकाची निवड करून त्यांचा सत्कार व व्याख्यान आयोजित केले, २३ सप्टेंबर रोजी लोहपुरुष सरदार वल्लभाई पटेल यांच्या भारताचे अखंडतत्व कायम ठेवण्याच्या दृष्टिकोनातून केलेल्या कार्याबद्दल व त्यांच्या कणखर नेतृत्वाची विद्यार्थ्यांना ओळख व्हावी या उद्देशाने ऑपरेशन पोलो, आर्टिकल ३७० कारगिल विजय दिवस, ऑपरेशन सिंदूर यांच्या चित्रफिती दाखवण्यात आल्या, २४ सप्टेंबर रोजी राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस उत्साहात साजरा करण्यात आला, २५ सप्टेंबर रोजी पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त निबंध स्पर्धा आयोजित करून हा दिवस अंत्योदय दिवस म्हणून साजरा केला, २६ सप्टेंबर हा दिवस जागतिक पर्यावरण दिवस म्हणून साजरा करताना महाविद्यालय परिसरात विविध झाडांची लागवड करण्यात आली, २७ सप्टेंबर हा दिवस विश्व पर्यटन दिवस म्हणून साजरा करण्याच्या निमित्ताने छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याबद्दल विद्यार्थ्यांना माहिती होण्याच्या

वर्ष :५, अंक क्रं. : ५८, ऑक्टोबर २०२५ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी






दृष्टिकोनातून युनेस्कोच्या यादीत समाविष्ट झालेल्या गड किल्ल्याच्या चित्रफिती विद्यार्थ्यांना दाखवण्यात आल्या, २८ सप्टेंबर रोजी शहीद भगतसिंग यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. त्यानिमित्त त्यांच्या कार्याबद्दल युवकांमध्ये देशभक्ती, साहस आणि त्यांच्या आदर्शाचे स्मरण होण्यासाठी चि. अभिमन्यु धुस या विद्यार्थ्यांने त्यांच्या कार्याची ओळख करून दिली, २९ सप्टेंबर हा दिवस जागतिक हृदय दिवस म्हणून साजरा करताना हाळगाव प्राथमिक आरोग्य केंद्राच्या आरोग्य अधिकारी डॉ. संजीवनी बारस्कर यांनी हृदय दिनाचे महत्त्व स्पष्ट करून हृदयाचे आजार त्यांची कारणे, लक्षणे व प्रतिबंधक उपाय याबाबत सखोल मार्गदर्शन केले तसेच आरोग्य सेविका श्रीमती राणी नागरगोजे यांनी निरोगी जीवनशैली, संतुलित आहार, नियमित व्यायाम व ताण-तणाव नियंत्रण याबद्दल माहिती दिली, ०२ ऑक्टोबर, २०२५ रोजी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीच्या निमित्ताने महाविद्यालय परिसरात स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. या पंधरवड्यासाठी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. दत्तात्रय सोनवणे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. पोपट पवार यांनी स्वयंसेवकांच्या श्रमदानातून हा पंधरवाडा यशस्वीरित्या साजरा करण्यात मोलाची भूमिका बजावली.

## कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे दीक्षारंभ कार्यक्रम संपन्न





**दि. ९ ऑक्टोबर, २०२५.** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित दीक्षारंभ कार्यक्रमानिमित्त करीयर संधी या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणुन जामखेड येथील सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. नंदकुमार सोनवलकर उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. दत्तात्रय सोनवणे होते. यावेळी मुख्य समुपदेशक डॉ. गोकुळ वामन, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. विवेकानंद कुलकर्णी, सहाय्यक प्राध्यापक डॉ. मनोज गुड उपस्थित होते.

याप्रसंगी मार्गदर्शन करतांना श्री. नंदकुमार सोनवलकर म्हणाले की कृषि ही संकल्पना खूप मोठी असून या क्षेत्रात कार्य करण्यास भरपूर संधी आहेत. कृषि क्षेत्र फक्त शेती करणे असे नाही, तर आधुनिक विज्ञान, तंत्रज्ञान आणि उद्योजकतेमुळे हे एक आकर्षक आणि संधींनी

वर्ष :५, अंक क्रं. : ५८, ऑक्टोबर २०२५ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

भरलेल क्षेत्र आहे. जिथे तुम्ही तुमच्या कलागुणांना वाव देऊ शकता. तुम्ही तुमच्यातील कौशल्यांचा विकास करा. परिपूर्ण विद्यार्थी बना. यशस्वी बनायचे असेल तर सोशल मिडीयाचा वापर कमी करा. कृषि क्षेत्रात घेतलेल्या प्रवेश संधीचे सोने करा. तुम्हाला तुमचे स्वप्न साकार करायचे असेल तर नकारात्मक विचारांपासून दूर राहा. आपल्या ध्येयावर ठाम राहा, तुमचा आत्मविश्वास डगमगू देऊ नका, तुमच्या ध्येयावर लक्ष केंद्रित करा, मोठे स्वप्न बघा व ते सातत्याने साकार करण्यासाठी प्रयत्न करा. डॉ. दत्तात्रय सोनवणे यांनी अध्यक्षीय भाषणातून साधी राहणी उच्च विचारसरणी ठेवा, सुसंवाद कौशल्य विकसित करा, स्वतःला ओळखा, जिद्द चिकाटी ठेवा, आपले ध्येय निश्चित करून त्या दिशेने सातत्यपूर्ण प्रयत्न करा असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहाय्यक प्राध्यापक वनस्पती रोगशास्त्र डॉ. मनोज गुड यांनी केले. प्रमुख अतिथींची ओळख सहाय्यक प्राध्यापक कृषि विस्तार डॉ. प्रणाली ठाकरे यांनी करून दिली. सदर कार्यक्रमासाठी कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे नव्याने प्रवेश घेतलेले सर्व विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रथम वर्षातील विद्यार्थी चि. अभिमन्यु धुस यांनी तर कु. ज्योती दौंड हीने उपस्थितांचे आभार मानले.

## कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे माजी राष्ट्रपती स्वं. डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांची जयंती साजरी





**दि. १५ ऑक्टोबर, २०२५.** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे माजी राष्ट्रपती स्व. डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांची ९४ वी जयंती साजरी करण्यात आली. महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. दत्तात्रय सोनवणे यांनी स्वं. डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पूजन केले तसेच इतर शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी प्रतिमेस अभिवादन केले. मराठी भाषा विभागाची घेवू या एकच वसा मराठीला बनवू या ज्ञानभाषा ही संकल्पना विचारात घेऊन स्वं. डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून ग्रंथालयात ग्रंथप्रदर्शन उपक्रमाचे आयोजन करून साजरा करण्यात आला. डॉ. दत्तात्रय सोनवणे यांनी स्वं. डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या बालपणापासून ते राष्ट्रपती पदापर्यंतच्या प्रवासाबद्दल विद्यार्थ्यांना माहिती दिली. तसेच मानवी जीवनात वाचन किती महत्वाचे आहे हे अनेक उदाहरणे देऊन स्पष्ट केले. वाचन हेच घडवते जीवन यावर ही आपले मत व्यक्त केले. मराठी भाषा ही आपल्या राज्याच्या संस्कृतीचा परंपरेचा आणि विचार संपदेचा केंद्रबिंदू आहे. या भाषेची जपणूक करण्याची जबाबदारी युवकांवर आहे, ते जपण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमादरम्यान ग्रंथालयातील वाचन साहित्याचा उपयोग करणाऱ्या वाचकांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. यावेळी, सहयोगी प्राध्यापक डॉ. गोकुळ वामन, सहाय्यक ग्रंथपाल श्री. महादू शिंदे, सहाय्यक प्राध्यापक डॉ. अंबादास मेहेत्रे, डॉ. किरण चौधरी, डॉ. प्रशांत सावंत, वैद्यकीय अधिकारी डॉ. दीपक वाळुंजकर, सहाय्यक अधिक्षक श्री. संजय आढाव आदी शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. प्रथम वर्षातील विद्यार्थी चि. अभिमन्यु धुस याने आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चतुर्थ वर्षाची विद्यार्थिनी कु. सिद्धी पवार हीने केले तर नियोजन सहाय्यक ग्रंथपाल श्री. महादू शिंदे यांनी केले.

## कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे इंदिरा गांधी पुण्यतिथी व सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती साजरी

**दि. ३१ ऑक्टोबर, २०२५.** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे भारताच्या माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांची पुण्यतिथी राष्ट्रीय संकल्प दिवस व लोहपुरूष सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती राष्ट्रीय एकता दिवस म्हणून साजरी करण्यात आली.



महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये दृढ संकल्पाची व एकात्मतेची भावना निर्माण व्हावी या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी, सहयोगी अधिष्ठाता डॉ. दत्तात्रय सोनवणे यांनी इंदिरा गांधी व सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पूजन केले, तसेच इतर शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी प्रतिमेस अभिवादन केले. विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. विवेकानंद कुलकर्णी यांनी इंदीरा गांधी व सरदार वल्लभभाई पटेल यांच्या महान कार्यांची ओळख विद्यार्थ्यांना करुन दिली. इंदिरा गांधी एक धोरणात्मक नेतृत्त्व होते. त्यांनी १९७१ च्या युद्धात अमेरिकेच्या दबावाला न जुमानता कणखर भूमिका घेतली, पाकिस्तानचा पराभव करून भारताचा विजय सुनिश्चित केला, ज्यामुळे बांगलादेशाची निर्मिती झाली आणि दक्षिण आशियामध्ये भारताचे वर्चस्व वाढले, १४ मोठ्या व्यावसायिक बँकांचे राष्ट्रीयीकरण केले. सरदार वल्लभभाई पटेल यांनी भारताचे पहिले उपपंतप्रधान आणि गृहमंत्री म्हणून ५६५ संस्थाने एकत्र आणण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले, ज्यामुळे ते 'भारताचे लोहपुरुष' म्हणून ओळखले जातात. याशिवाय त्यांनी शेतकऱ्यांचे हक्क आणि काँग्रेस पक्षाच्या संघटनात्मक उभारणीमध्येही महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे नेते म्हणून दोन्ही व्यक्तींनी पक्ष संघटनेच्या बळकटीकरणात सिंहाचा वाटा उचलला असे त्यांनी मनोगतातून स्पष्ट केले. प्रथम वर्षातील विद्यार्थी चि. अभिमन्यु धुस आणि कु. तेजस्विनी गळवे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

## कृषि महाविद्यालय, पुणे अंतर्गत कृषि शास्त्रज्ञ भेट अभियान






**दि. ८ ऑक्टोबर, २०२५.** कृषि महाविद्यालय, पुणे येथील विभागीय विस्तार केंद्राच्या शास्त्रज्ञांनी कृषि विभागाच्या वतीने आयोजित कृषि शास्त्रज्ञ भेट अभियानांतर्गत सिंहगड पश्चिम हवेलीतील शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन भात व खरीप पिकांची पाहणी केली. सिंहगड पायथ्यावरील खानापूर व मनेरवाडी (ता. हवेली) येथे पुणे विभागीय विस्तार केंद्राचे शास्त्रज्ञ डॉ. विकास भालेराव यांच्या हस्ते या अभियानास सुरुवात झाली. यावेळी शेतकऱ्यांना खोडकीड, मावा, तुडतुडे कीड तसेच करपा रोगावर नियंत्रण कसे करावे याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. हवेली तालुका कृषि अधिकारी श्री. अमित रणवरे यांनी मालखेड, वरदाडे, खानापूर येथील भात पिकांची पाहणी केली. यावेळी त्यांनी पिकांवरील कीड व बुरशीजन्य रोगांवर नियंत्रण ठेवण्यासाठी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी शेतकऱ्यांकडून चांगला प्रतिसाद मिळत असल्याने बहुतांश भात पिकांवरील रोगाचे नियंत्रण झाल्याचे त्यांनी सांगितले. याप्रसंगी शास्त्रज्ञ डॉ. मृणाल अजोतीकर, मंडल कृषि

अधिकारी श्रीमती नीलम बोरकर, उपकृषि अधिकारी श्री. विश्वजीत सरकाळे, सहाय्यक कृषि अधिकारी श्री. तुषार मिटके, श्रीमती मेघा राठोड, श्री. विशाल ढोरे, कृषि मित्र श्री.हनुमंत वाघ, श्री. प्रभाकर जावळकर उपस्थित होते.

## कसबे डिग्रज येथील हळद संशोधन केंद्राला सिंधुदुर्ग जिल्ह्यातील शेतकऱ्यांची भेट




**दि. ८ ऑक्टोबर, २०२५.** सिंधुदुर्ग जिल्हापरिषेदेच्या वतीने सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ६० हळद उत्पादक शेतकऱ्यांनी व आठ अधिकाऱ्यांनी हळद संशोधन केंद्र, कसबे डिग्रज येथे भेट दिली. यावेळी संशोधन केंद्राचे प्रभारी अधिकारी डॉ. श्रीमंत राठोड, हळद संशोधन प्रकल्पाचे प्रमुख डॉ. मनोज माळी, रोग शास्त्रज्ञ डॉ. सचिन महाजन, कृषि सहाय्यक श्री. प्रशांत पवार उपस्थित होते. यावेळी या अभ्यास दौऱ्यातील शेतकऱ्यांनी या केंद्रांतर्गत विकसित केलेल्या हळदवान लागवड तंत्रज्ञान, बियाणे प्रक्रिया यासह बाजारपेठेची माहिती घेतली. याप्रसंगी डॉ. श्रीमंत राठोड यांनी हळद पिकाविषयी चलचित्र कृतीद्वारे बियाणे निवड, बीज प्रक्रिया, हळद लागवड पद्धत, गादीवाफा, रुंदवरंबा पद्धत, हळद लागवड व प्रक्रिया उद्योगातील यांत्रिकीकरण, अवजारे याबाबत सखोल मार्गदर्शन केले. डॉ. मनोज माळी यांनी हळद लागवडीचे तंत्रज्ञान यावर माहिती दिली.  डॉ. सचिन महाजन यांनी कंदमाशी, खोडकिड, हुमणी, सूत्र कृमी या विविध किडी तसेच कंदकुज, करपा या रोगाविषयी शेतकऱ्यांना नियोजन तसेच उपाययोजनांची माहिती दिली. श्री. प्रशांत पवार यांनी काढणी व्यवस्थापन व काढणी पश्चात प्रक्रिया याबाबत माहिती दिली.

## कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे दीक्षारंभ समारंभ मोठ्या उत्साहात संपन्न








**दि. १ ऑक्टोबर, २०२५.** कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथील कृषि पदवी अभ्यासक्रमात २०२५–२६ या शैक्षणिक वर्षामध्ये प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा दीक्षारंभ समारंभ दि. १९ सप्टेंबर, २०२५ ते १ ऑक्टोबर, २०२५ या कालावधीत मोठ्या उत्साहात संपन्न झाला. दीक्षारंभ कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुक्ताईनगर कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील हे उपस्थित होते. या

कार्यक्रमाला प्रमुख व्याख्याते म्हणून डॉ. प्रशांत पवार, सहयोगी प्राध्यापक, कृषि महाविद्यालय, धुळे यांची उपस्थिती लाभली. तसेच कार्यक्रमास पालकांची उपस्थिती लाभली. यावेळी प्रमुख मार्गदर्शन करतांना डॉ. प्रशांत पवार म्हणाले विद्यार्थ्यांनी विद्यार्थी दशेत सदैव शिकत राहिले पाहिजे, गुरुजनांचा आदर केला पाहिजे. शिक्षणाबरोबर कला–क्रीडा स्पर्धेत सहभाग घेतला पाहिजे. यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीन विकास होतो. अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना डॉ. संदीप पाटील म्हणाले नवीन अभ्यासक्रम हा कौशल्याभिमुख असून यामुळे कृषि उद्योजक घडण्यास मदत होईल.

दिक्षारंभाच्या अंतर्गत दि. २४.०९.२०२५ रोजी प्रख्यात व्यक्तीमत्वांचे मार्गदर्शन कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून जिल्हा कृषी अधिकारी श्री. अभिनव माळी आणि जळगाव जिल्हा परिषदेचे मोहीम अधिकारी श्री. अविनाश खैरनार यांची उपस्थिती लाभली. यावेळी प्रमुख पाहुणे श्री. अभिनव माळी आणि श्री. अविनाश खैरनार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

दिक्षारंभाच्या अंतर्गत २५.०९.२०२५ रोजी प्रख्यात व्यक्तीमत्वांचे मार्गदर्शन कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून श्री. निलेश बढे, भारत कृषी उद्योग, मुक्ताईनगर आणि डॉ. इंद्रायणी बढे, प्राध्यापक होमियोपॅथी, राष्ट्रसंत जनार्धन स्वामी होमियोपॅथी महाविद्यालय, कोपरगाव यांची उपस्थिती लाभली. यावेळी प्रमुख पाहुणे श्री. निलेश बढे आणि डॉ. इंद्रायणी बढे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना डॉ. संदीप पाटील म्हणाले की दीक्षारंभ कार्यक्रमाचा मुख्य उद्देश्य म्हणजे वेगवेगळ्या क्षेत्रातील नामवंत व्यक्ति व विद्यार्थ्यांमद्धे संवाद घडवून आणणे जेणेकरून विद्यार्थ्यांना आपल्या ध्येयाकडे मार्गक्रमण करण्याची प्रेरणा मिळेल. या समारंभामध्ये महाविद्यालयाचे डॉ. दत्तात्रय पाचारणे, डॉ. रमेश चौधरी, डॉ. बाळासाहेब रोमाडे, डॉ. कुशल ढाके, डॉ. सागर बंड, डॉ. रवींद्र जाधव, डॉ. मनीषा पालवे आणि सर्व शिक्षकेतर कर्मचाऱ्याची उपस्थिती लाभली. तसेच कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. कुशल ढाके यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. सागर बंड यांनी केले.

## कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि लाल बहादूर शास्त्री जयंती साजरी



**दि. २ ऑक्टोबर, २०२५.** कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि लाल बहादूर शास्त्री यांची जयंती महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली साजरी करण्यात आली. या प्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करतांना सहाय्यक प्राध्यापक डॉ. बाळासाहेव रोमाडे यांनी सांगितले की, महात्मा गांधी यांनी भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात महत्त्वाची भूमिका बजावली. महात्मा गांधी हे सत्य आणि अहिंसेच्या धोरणासाठी ओळखले जातात. त्यांनी १९२२ मध्ये असहकार चळवळ आणि १९३० मध्ये मिठाचा सत्याग्रह आणि नंतर १९४२ मध्ये भारत छोडो आंदोलनात स्वातंत्र्य लढ्यात देशाचे नेतृत्व केले. तसेच श्री. लाल बहादूर शास्त्री हे भारताचे दुसरे पंतप्रधान होते. देशात हरितक्रांती घडवून आणण्यात आणि अन्नधान्याच्या बाबतीत देशाला स्वयंपूर्ण बनवण्यात त्यांचे महत्त्वाचे योगदान होते. ते त्यांच्या सचोटी आणि साधेपणासाठी ओळखले जातात. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन डॉ. कुशल ढाके यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनाच्या स्वयंसेवकांनी तसेच राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी, श्री. नामदेव धुर्वे आणि सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. कुशल ढाके यांनी परिश्रम घेतले.

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

मफुकृवि ई वार्ता

ऑक्टोबर २०२५



## कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे ‘स्वच्छता ही सेवा’ अभियान पंधरवडा उत्साहात साजरा






**दि. २ ऑक्टोबर, २०२५.** संत मुक्ताई कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर, जि. जळगाव येथे उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, महाराष्ट्र शासन यांच्या सुचनेनुसार दि. १७ सप्टेंबर ते ०२ ऑक्टोबर, २०२५ हा ‘स्वच्छता ही सेवा’ अभियान पंधरवडा आयोजित करण्यात आला. या कालावधीत कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थी परिषदेचे अध्यक्ष तथा सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

दि. १७/०९/२०२५ रोजी डॉ. संदीप पाटील यांनी विद्यार्थ्यांना स्वच्छता ही सेवा अभियान पंधरवडाबाबत मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास सहाय्यक कुलसचिव श्री. प्रशांत नागे, डॉ. दत्तात्रय पाचरणे, डॉ. गणेश देशमुख, कूलमंत्री डॉ. आर. डी. चौधरी, प्रा. एन. जी. धूर्वे, डॉ. कुशल ढाके, डॉ. सागर बंड, डॉ. मनीषा पालवे आणि सर्व शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती लाभली. दि. १८ सप्टेंबर, २०२५ रोजी महाविद्यालयात स्वच्छतात्सव हा उपक्रम घेण्यात आला. यावेळी महाविद्यालयाच्या आवारात साफसफाई करण्यात आली. दि. २२ सप्टेंबर, २०२५ रोजी भारतरत्न डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या शिक्षण क्षेत्रातील योगदानास स्मरण करून विद्यापीठातील महाविद्यालयातील विद्यार्थीप्रिय प्राध्यापकांची निवड करुन त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील यांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस आठवड्याबाबत मार्गदर्शन केले. दि. २३ सप्टेंबर, २०२५ रोजी विद्यार्थ्यांना भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल यांच्या कणखर नेतृत्वाची ओळख व्हावी यासाठी डॉ. कुशल ढाके यांनी व्याख्यान दिले.

दि. २४ सप्टेंबर, २०२५ रोजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस साजरा करण्यात आला. यावेळी डॉ. दत्तात्रय कोळी, सहयोगी प्राध्यापक इतिहास विभाग व माजी रा से यो अधिकारी, जी जी खडसे कॉलेज, मुक्ताईनगर यांची उपस्थित होते. यावेळी अध्यक्षस्थानी सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील हे होते. दि. २५ सप्टेंबर, २०२५ हा अंत्योदय दिवस पंडीत दीनदयाळ उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त हा दिवस साजरा करण्यात आला. या निमित्ताने पोष्टर (भित्तिचित्रे) तयार करणे आणि निबंधलेखन स्पर्धा घेण्यात आल्या. यावेळी स्पर्धेमधील विजेत्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले व स्वच्छ ही सेवा अभियानांतर्गत एक दिन एक घंटा एक साथ हा कार्यक्रमामध्ये साफसफाई अभियान राबविण्यात आले. दि. २६ सप्टेंबर, २०२५ या दिवशी जागतिक पर्यावरण आरोग्य दिवसाच्या निमित्ताने महाविद्यालयाच्या आवारात प्लॅस्टिक निर्मूलन करण्यात आले व वृक्ष लागवड कार्यक्रम घेण्यात आला. दि. २७ सप्टेंबर, २०२५ रोजी विश्व पर्यटन दिवसाच्या निमित्ताने आणि नुकत्याच छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ गडकिल्ल्यांचा UNESCO च्या यादीमध्ये समावेश करण्यात आल्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याबद्दल श्री. सागर पाटील यांनी विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली. दि. २८/०९/२०२५ रोजी शहीद भगतसिंग जयंतीच्या निमित्ताने व्याख्यान आयोजित करण्यात आले. दि. २९/०९/२०२५ रोजी जागतिक / विश्व हृदय दिवसाच्या निमित्ताने पोष्टर (भित्तिचित्रे) तयार करणे आणि निबंधलेखन स्पर्धा घेण्यात आल्या. स्पर्धेमधील विजेत्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले. दि. ०२/१०/२०२५ रोजी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी महाविद्यालय आवारात स्वच्छता केली.

वर्ष :५, अंक क्रं. : ५८, ऑक्टोबर २०२५ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल जयंती साजरी

**दि. ३१ ऑक्टोबर,२०२५.** कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे भारताचे लोहपुरूष भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल यांची १५० वी जयंती महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली साजरी करण्यात आली. याप्रसंगी उपस्थितांना एकता दिनाची



शपथ देण्यात आली. या प्रसंगी डॉ. संदीप पाटील मार्गदर्शन करतांना म्हणाले की सरदार वल्लभभाई पटेल हे भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील एक महत्त्वाचे नेते होते. त्यांनी स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ५६२ संस्थानांचे भारतीय संघराज्यात विलीनीकरण करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांना १९९१ मध्ये मरणोत्तर भारतरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमास डॉ. दत्तात्रय पाचरणे, डॉ. बाळासाहेब रोमाडे, सहाय्यक कुलसचिव श्री. प्रशांत नागे, डॉ. कुशल ढाके, डॉ. सागर बंड, डॉ. सागर पाटील, डॉ. रवींद्र जाधव, डॉ. आबासाहेब पराडे, डॉ. मनीषा पालवे, डॉ. ऐश्वर्या पाटील आणि सर्व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. कुशल ढाके यांनी तर आभार डॉ. रवींद्र जाधव यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी तसेच राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी श्री. नामदेव धुर्वे आणि सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. कुशल ढाके यांनी परिश्रम घेतले.

## डॉ. नारायण मुसमाडे ग्रीन व्हिजनरी अवॉर्ड – यंग सायंटिस्ट (Young Scientist) पुरस्काराने सन्मानित





NATIONAL BIOPESTICIDES SUMMIT 2025
Assam Agricultural University, Jorhat
Agricultural Micro Organism Manufacturers and Farmers Association (AMMA), Nashik
Green Visionary Award - Young Scientist (<40 years)
Dr. Narayan Annasaheb Musmade

**दि. १० ऑक्टोबर २०२५** राजर्षी छत्रपती शाहू महाराज कृषि महाविद्यालय, कोल्हापूर येथे वनस्पती रोगशास्त्र विषयात सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत असलेले डॉ. नारायण अण्णासाहेब मुसमाडे यांना आसाम कृषि विद्यापीठ, जोरहाट (आसाम) येथे आयोजित राष्ट्रीय जैवकीटकनाशक शिखर परिषद–२०२५ या कार्यक्रमात ग्रीन व्हिजनरी अवॉर्ड–यंग सायंटिस्ट अवॉर्ड या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार संचालक, भा.कृ.अ.प.–कृषि दृष्टि से महत्त्वपूर्ण सूक्ष्मजीवों का राष्ट्रीय ब्यूरो (मऊ) चे सन्माननीय डॉ. आलोक के. श्रीवास्तव यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या सोहळ्यास डॉ. के. एल. गुर्जर (संचालक, केंद्रीय कीटकनाशक मंडळ आणि नोंदणी समिती, भारत सरकार), डॉ. संजय चेतीया (संचालक संशोधन, आसाम कृषि विद्यापीठ, जोरहाट) व डॉ. एस. के. दुबे (भाकृअनुप–केंद्रीय

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

मफुकृवि ईवार्ता

ऑक्टोबर २०२५



मृदा क्षारता संशोधन संस्था (करनाल, हरियाणा) यांची मान्यवर उपस्थिती लाभली. डॉ. मुसमाडे यांनी पर्यावरण अनुकूल पद्धतीने घरोगांचे व्यवस्थापन करण्यासाठी ग्रीन नॅनो पार्टिकल्स बनवले असून यासाठी त्यांना भारत सरकारचे पेटंट प्राप्त झाले आहे. त्यांनी जैविक पद्धतीने पिकावरील रोग नियंत्रणासाठी उपयुक्त सूक्ष्मजीवांचा वापर यावर केलेल्या उल्लेखनीय संशोधनासाठी त्यांना हा पुरस्कार देण्यात आला. डॉ. मुसमाडे यांच्या या यशाबद्दल राजर्षी छत्रपती शाहू महाराज कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. शैलेंद्र कांबळे, विभागप्रमुख डॉ. दीपक देशमुख (वनस्पती रोगशास्त्र), डॉ. भरत कोलगने (विस्तार शिक्षण विभागप्रमुख) तसेच सर्व प्राध्यापक व अधिकारी यांनी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले व त्यांच्या पुढील संशोधनासाठी शुभेच्छा दिल्या.

## कोल्हापूर कृषि महाविद्यालयाची विद्यार्थिनी सकाळ समूहाकडून सन्मानित




**दि.९ ऑक्टोबर, २०२५** सकाळ समूह यांच्या (Young Inspirators Network) यिन वर्धापन दिनानिमित्त वर्ष २०२४-२५ मध्ये राबविण्यात आलेल्या विविध सामाजिक उपक्रमांमध्ये उस्फूर्त सहभाग नोंदविल्याबद्दल राजर्षी छत्रपती शाहू महाराज कृषि महाविद्यालय, कोल्हापूर महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु. आर्या अजय पवार हिचा आनंद भवन, सायबर कॉलेज येथील कार्यक्रमात पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. कु. आर्या पवार हिने सामाजिक जाणीव, नेतृत्वगुण व सेवाभावी वृत्तीचे उत्तम दर्शन घडवले आहे. तिच्या या कार्याची दखल घेत सकाळ समूह यांच्यावतीने तिला सन्मानपत्र प्रदान करण्यात आले. यिन तर्फे सलग दुसऱ्या वर्षी तिला गौरविण्यात आले आहे.

प्रकाशक : डॉ. गोरक्ष ससाणे
संचालक, विस्तार शिक्षण

प्रमुख संपादक : डॉ. सचिन सदाफळ
प्रभारी अधिकारी, प्रसारण केंद्र

सहसंपादक : श्री. सुनिल राजमाने
कनिष्ठ संशोधन सहाय्यक, प्रसारण केंद्र

डिझाईनर : श्री. प्रदिप कोळपकर
कलाकार तथा छायाचित्रकार, प्रसारण केंद्र
श्री. सिध्दार्थ साळवे
लिपीक-नि-टंकलेखक, प्रसारण केंद्र

मफुकृवि विस्तार प्रकाशन क्र. २८०८/२०२५